महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.९/०१४३८
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २०.०१.२०१७

# परिपत्रक

विषय : मुस्लीम धर्मीयांच्या सणासाठी जाहीर सुट्टीऐवजी सण अन्य दिवशी येत असल्यास त्या दिवसाची "नैमित्तिक रजा अथवा अर्जित रजा" म्हणून मंजूर करणेबाबत.

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.सार्वसु-१११६/ प्र.क्र.२५०/२९ दि.२७ डिसेंबर २०१६.
२) परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.९/३६६३२ दि.०८ डिसेंबर २०१६.

........

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी शासन परिपत्रक क्र.सार्वसु-१११६/ प्र.क्र.१३८/२९ दि.१८ नोव्हेंबर २०१६ अन्वये सन २०१७ या वर्षासाठीच्या सार्वजनिक सुट्टया जाहीर करण्यात आलेल्या आहेत. याच धर्तीवर म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादितमधील प्रशासकीय कार्यालयामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सन २०१७ या वर्षासाठी परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.९/३६६३२ दि.०८ डिसेंबर २०१६ अन्वये सार्वजनिक सुट्टया जाहिर करण्यात आलेल्या आहेत.

२. आता शासन परिपत्रक क्र. सार्वसु-१११६/प्र.क्र.२५०/२९ दि.२७ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांकरिता सन २०१७ या वर्षासाठीच्या सार्वजनिक सुट्टयांमध्ये जाहिर करण्यात आलेल्या मुस्लीम धर्मीयांच्या सणासाठीच्या सुट्टी जाहिर केलेल्या दिवसाऐवजी सण अन्य दिवशी येत असल्यास मुळ घोषित सुट्टीमध्ये बदल न करता राज्यामधील मुस्लिम शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना या दिवशी पूर्वपरवानगीशिवाय नैमित्तिक रजा अथवा नैमित्तिक रजा खाल्यावर शिल्लक नसल्यास, अर्जित रजा मंजूर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन परिपत्रक दि.२७.१२.२०१६ ची प्रत सोबत जोडली आहे.

३. सर्व सक्षम अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, शासन परिपत्रक दि.२७.१२.२०१६ मधील सूचनांचे अवलोकन करून त्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Circular F.N.9 - Muslim Festival.doc*

**मुस्लीम धर्मीयांच्या सणासाठी जाहीर सुट्टी ऐवजी सण अन्य दिवशी येत असल्यास त्या दिवसाच्या रजेसाठी करावयाच्या तात्कालीक व्यवस्थेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : सार्वसु-१११६/प्र.क्र.२५०/२९,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २७ डिसेंबर, २०१६

**वाचा:** शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सार्वसु-१११६ /प्र.क्र.१३८/ २९, दि.१८.११.२०१६

**शासन परिपत्रक:-**

शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सार्वसु-१११६ /प्र.क्र.१३८/ २९, दिनांक १८.११.२०१६ अन्वये सन २०१७ या वर्षासाठीच्या सार्वजनिक सुट्टया जाहिर करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये जाहिर करण्यात आलेल्या मुस्लीम धर्मीयांच्या सणासाठीच्या सुट्टी जाहिर केलेल्या दिवसा ऐवजी सण अन्य दिवशी येत असल्यास मुळ घोषित सुट्टीमध्ये बदल न करता राज्यामधील मुस्लिम शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना या दिवशी पूर्वपरवानगीशिवाय नैमित्तिक रजा अथवा नैमित्तक रजा खात्यावर शिल्लक नसल्यास, अर्जित रजा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी तसेच सर्व शासकीय कार्यालयाचे संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी यांनी त्यांच्या विभागातील/जिल्हयातील / कार्यालयातील सर्व मुस्लिम शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना जे या दिवशी पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहीले असतील त्यांना वरीलप्रमाणे रजा त्यांच्या रजा मागणी अर्जानुसार मंजूर करावी.

३. सदरचे आदेश राज्य शासनातील सर्व मुस्लीम अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी भविष्यातील त्यांच्या सणासाठीच्या सर्व घोषित सुट्टयांच्या बाबत ऐनवेळी सणाच्या दिवसामध्ये बदल होण्याच्या परिस्थितीतील स्थायी व्यवस्था म्हणून लागु राहतील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६१२२७१६१७३६५९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra M Jadhav

Digitally signed by Rajendra M Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=656ebca17998fd5c29178a5abcf1a a60d72bd5515ddc791d9ad9786418f07e4f, cn=Rajendra M Jadhav
Date: 2016.12.27 16:25:33 +05'30'

**( रा.मा.जाधव )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव,मंत्रालय,मुंबई.
३. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री/ यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई.
४. मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई.
५. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधानसचिव/सचिव, मंत्रालय,मुंबई
६. सर्व मंत्रालयीन विभाग
७. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई(आवश्यक ती प्रसिध्दी देण्यास्तव)
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. सर्व जिल्हाधिकारी,
१०.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
११.आयुक्त, सर्व महानगरपालिका,
१२.निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग,नवी दिल्ली,
१३.निवडनस्ती (कार्यासन-२९).